निफौ.ख.क्र. २३९/२०२५
सरकार-वि- पंढरी व इतर
निशाणी क्र. ७२

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०७ यांची साक्ष.**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**नाव** - विनोद गोविंदराव राऊत

**वय** - ४६ वर्ष, **पद** - क्षेत्र सहाय्यक

**नेमणूक** - क्षेत्र सहाय्यक, नागलवाडी, खापा, जि. नागपूर.

**सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत.**

मी दि. १७.०३.२०२५ पासून क्षेत्र सहाय्यक या पदावर कार्यरत आहे. दि. २०.०३.२०२५ रोजी कबूली जबाब किशोर भलावी, नंदू भलावी व छेदीलाल ठाकूर यांनी दिला. सकाळी १०.०० वाजता किशोर भलावी यांनी माझ्या, सहाय्यक वन संरक्षक गंगावने, आठवले, यांच्यासमक्ष बयाण दिला. त्याने सांगितले की, पंढरी कुंभरे याने गजानन श्रीरामे यांच्या शेतात ११ के.व्ही. करंट लावून रानडुक्कराची शिकार केली. त्यानंतर उत्तम मेश्राम सोबत किशोर भलावीने नंदू भलावीला रानडुक्कराचे मटन पाठवले. उरलेले मटन छेदीलाल ठाकूर याच्या विट भट्टयावर नेवून दिले. त्याचा रू. २०००/- मध्ये सौदा झाला होता. किशोर भलावी, नंदू भलावी व छेदीलाल ठाकूर आम्हाला गजानन श्रीरामेच्या शेतात घेवून गेले. त्यानंतर नंदू भलावीच्या घरी नंदू भलावीने ज्या ठिकाणी मटन आणून दिले ते ठिकाण दाखवले. छेदीलाल ठाकूर याने विट भट्टयावर कोणत्या ठिकाणी मटन शिजवून खाल्ले ते ठिकाण दाखवले. संध्याकाळी आम्ही सर्व वापस आलो. मला दि. २०.०३.२०२५ रोजीचा कबूली जबाब दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. ते नि.क्र. २५ व २६ वर आहे.

**२.** दि. २१.०३.२०२५ रोजी दोन आरोपींचे लोकेशन घटनास्थळी घटनेच्या दिवशी मिळाल्याने त्याची चौकशी करिता आम्ही गेलो. तेथे चौकशी केली व त्याप्रमाणे नि.क्र. ५० वरील मोक्का पंचनामा तयार करण्यात आला. तो मला दाखवण्यात आला. त्यावेळी मी हजर होतो.

**३.** दि. २२.०३.२०२५ रोजी राजू दरसमा व माणिक सिलू यांचे कबूली जबाब माझ्यासमक्ष नोंदवण्यात आले. त्यांनी सांगितले की, घटनेपूर्वी त्यांनी शिकारीचा सापळा रचला होता. मला नि.क्र. ५३ वरील कबूली जबाब व नि.क्र.२७ वरील मेमोरेंडम पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**४.** दि. २३.०३.२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता तोरणी, मध्यप्रदेश येथे पोहोचलो. राजू दरसमा याच्या घराची झडती घेतली असता प्लास्टीक कोटेड वायर मिळाले व जळालेले वायर मिळाले. सदरचा मुद्देमाल एम.ओ.क्र. ९ वर आहे. दि. २२.०३.२०२५ रोजी नंदू भलावीच्या घराची झडती घेतली तेव्हा त्याच्या वरच्या मजल्यावर उत्तम मेश्राम किरायाने राहत होता. त्याच्या रुममधून दोन धारदार सु-या जप्त केल्या. सदर मुद्देमाल मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. ते मला दाखवण्यात आले. ते तेच आहे. ते एम.ओ.क्र. १३ वर आहे. मला दि. २३.०३.२०२५ रोजीचा मेमोरेंडम पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तो नि. क्र. २८ वर आहे. मी आरोपींना ओळखतो.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्रीमती. जे.एच.शेंडे यांचेमार्फत**

**५.** नंदू भलावी व छेदिलाल ठाकूर यांनी दि. २०.०३.२०२५ रोजी कबूली जबाब खापा ऑफीस, पाटनसावंगी रोड, खापा येथे दिले. तेथे वन खात्यातील कर्मचारी व दोन पंच होते. पंचांची नावे पंकज कोल्हे व गौतम गंगाधर शेंडे अशी होती. कबूली जबाब सहाय्यक वन संरक्षक गंगावने यांनी नोंदवला. मी कबूली जबाबावर सकाळी ११.०० वाजता सही केली. त्यानंतर आम्ही मेमोरेंडम पंचनामा करायला गेलो. सदरची केस ही वाघाच्या शिकारी बद्दल आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरील आरोपींनी दिलेल्या कबूली जबाबात वाघाच्या शिकारी बद्दल एकही शब्द बोललेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाघाची शिकार व रानडुक्कराची शिकार जिथे झाली ते स्पॉट वेगळे आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, दोन्ही स्पॉट जवळ आहे व नाल्याच्या बाजूला आहे. हे म्हणणे खरे आहे की, रानडुक्कराचे

मटन, दात किंवा हात केसमध्ये जप्त केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, गुन्हयामध्ये पैसे जप्त केले नाही. प्लास्टीक कोटेड वायर अंदाजे १५ ते २० मिटर लांब आहे. हे म्हणणे खरे नाही की, नंदू भलावी, किशोर भलावी व छेदिलाल ठाकूर यांनी माझ्यासमक्ष कबूली जबाब दिला हे मी खोटे सांगत आहे. या केसचे तपास अधिकारी गंगावने आहे. मी दि. २०.०३.२०२५ रोजी कार्यालयात असल्याबाबत डायरी उतारा केसमध्ये दाखल केला नाही.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, दि. २१.०३.२०२५ रोजी काय चौकशी केली हे मला आठवत नाही. मी मोक्का पंचनाम्यावर सायंकाळी ४.०० वाजता सही केली. मोक्का पंचनामा सकाळी ११.०० वाजता सुरू करून सायंकाळी ४.०० वाजता संपवला. हे म्हणणे खरे आहे की, मी कार्यालयात आल्यावर सही केली. मी मोक्का पंचनाम्यावर गाडी क्र. एम. एच. ३१-०६७९ याने गेलो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पंच गैरहजर होते. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ५० वरील मोक्का पंचनामा डुक्कराच्या शिकारीबद्दलचा असून वाघाच्या शिकारीबद्दलचा नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ५० वरील पंचनाम्यावर माझी सही नाही. मी दि. २१.०३.२०२५ रोजी कार्यालयात असल्याबाबत डायरी उतारा केसमध्ये दाखल केला नाही.

**७.** हे म्हणणे खरे आहे की, दि. २२.०३.२०२५ रोजीचा नि.क्र. ५३ वरील कबूली जबाब कार्यालयामध्ये नोंदवला. हे म्हणणे खरे आहे की, राजू दरसमा व माणिक सिलू यांचा कबूली जबाब एकत्र नोंदवला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोन व्यक्ती एकत्र बोलल्यावर कंफ्यूजन होते. हे म्हणणे खरे नाही की, राजू दरसमा व माणिक सिलू यांचा जबाब गंगावने यांनी आपल्या मनाप्रमाणे नोंदवला. हे म्हणणे खरे आहे की, सापळा वाघाच्या शिकारीसाठी रचला होता की डुक्कराच्या शिकारीसाठी रचला होता हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, राजू दरसमा व माणिक सिलू यांनी माझ्यासमक्ष कोणताही कबूली जबाब दिलेला नाही.

**८.** राजू दरसमा यांच्याकडून प्लास्टीक कोटेड वायर सायंकाळी ४.०० वाजता जप्त केली. हे म्हणणे खरे आहे की, ती किती लांब होती हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, राजू दरसमा कडून प्लास्टीक कोटेड वायर जप्त केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेल्या दोन सु-यांची लांबी व जाडी मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष कोणत्याही सु-या जप्त केल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, नंदू भलावीच्या घरातून दोन सु-या जप्त केल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दि. २१.०३.२०२५, दि. २२.०३.२०२५ व दि. २३.०३.२०२५ वरील पंचनाम्यावर न वाचता सही केली. हे म्हणणे खरे आहे की, तपास अधिकारी सहाय्यक वन संरक्षक गंगावने यांना मी हजर असल्याबाबत कोणताही पुरावा दोषारापत्रामध्ये दाखल करण्याकरिता दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कार्यालयात बसून सहया केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.03.25 17:13:53 +0530

सावनेर,
दिनांक २५.०३.२०२६

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe